# प्रकरण चौथे

## उपसंहार

## प्रकरण चौथे

## उपसंहार

ग्रामीण मराठी साहित्याची निर्मिती करणा-या अनेक लेखकांमध्ये डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे महत्वाचे लेखक आहेत. नागनाथ कोत्तापल्ले हे एक महत्वाचे ग्रामीण लेखक असल्याने त्यांच्या साहित्याचे एका निश्चित भूमिकेवरून आकलन व मूल्यमापन केले पाहिजे. हे आकलन व मूल्यमापन करताना ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाबद्दल निश्चित भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे.

आतापर्यंतच्या प्रकरणांमध्ये " मराठी कादंबरीची पूर्वपीठिका "आणि नागनाथ कोत्तापल्ले यांच्या " उलट चालला प्रवाहो" व " गांधारीचे डोळे" या कादंब-यांच्या अभ्यास केला. आता या चौथ्या प्रकरणामध्ये केलेल्या अभ्यासाचा थोडक्यात निष्कर्ष मांडावयाचा आहे.

ग्रामीण साहित्याला व ग्रामीण साहित्यविषयक चळवळीला महाराष्ट्राच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवनात अर्थपूर्ण स्थान लाभले आहे. ही अर्थपूर्णता लक्षात घेऊन ग्रामीण साहित्याचा आस्थेने विचार करणारे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले हे एक महत्वाचे लेखक आहेत. नागनाथ कोत्तापल्ले हे कविमनाचे " पापुद्रे " हळूवार उलगडून दाखविणारे समीक्षक आहेत. " कर्फ्यू " च्या कुलूपकाटातही माणसातल्या पशूच्या हालचालीचा वेध घेणारा कथा-लेखक आणि साहित्यातील तथाकथित संकेत शिष्टाचारावर लेखन करणारा मांडकुदळ लेखक आहे. माणसांच्या मनातील ह्या संघर्षमय स्थितीचे संवेदन कादंबरीच्या घाटातून अतिशय तरलपणे टिपणारा कथाकार आणि ग्रामीण कादंबरी लेखन करणारा एक लेखक म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले होत.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी " मूड्स " हा कविता-संग्रह लिहिला आहे. " कर्फ्यू आणि इतर कथा' हा त्यांचा कथासंग्रह आहे.

तसेच " त्रिज्या " व " पापुद्रे " आणि ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध हे समीक्षालेखसंग्रह प्रसिध्द आहेत. नागनाथ कोत्तापल्ले यांनी दैनिक " लोकमत " या वृत्तपत्रातील"अक्षररंग"या पुरवणीमध्ये अनेक लेख लिहीले आहेत. तसेच त्यांनी विविध वाड्:मयीन नियतकालिकामधून लेखन केलेले दिसून येते.

मानवी मनाशी असलेल्या अर्थपूर्ण नात्यातून नागनाथ कोत्तापल्ले यांची कथा फुलत जात असल्याने ती अनुकरण मुक्त आहे. व्यक्तिगत मूल्यांचा आग्रह आणि वैचारिक अधिष्ठान असलेल्या या लेखकाला म्हणूनच जीवनाचे खरे आकलन झालेले दिसून येते. अज्ञान, दारिद्र, आणि दु:ख यामुळे पांगळ्या बनत चाललेल्या मानवी मनाचे खरेखुरे चित्रण " कर्फ्यू आणि इतर कथा" व " कावळा " या कथा संग्रहातील लेखनात दिसते. वास्तवाशी नाते जोडत असताना आत्मभान ठेवावे लागते याचा हल्ली सर्वांनाच विसर पडलेला दिसतो. तसा विसर कोत्तापल्ले यांना पडलेला नाही. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक या क्षेत्रातील दांभिकतेबद्दल असलेला विलक्षण संताप त्यांच्या लेखनामध्ये दिसून येतो. काहीशी उत्कट व संवेदागर्भ बनलेली त्यांची कथा संदर्भ मध्ये दिसते. म्हणूनच त्यांचा प्रवास मराठी कथा वाड्:मयाच्या दृष्टीने महत्वाचा ठरलेला आपणास दिसून ये तो. आपल्या प्रबंधाचे पहिले प्रकरण " मराठी कादंबरीची पूर्वपीठिका, हे आहे. मराठी कादंबरीची सुरवात ब्रिटिश काळापासून झाली असून निरनिराळ्या काळात लोकांच्या कादंबरीविषयीच्या अपेक्षा कशा बदलत गेल्या याचा अभ्यास या प्रकरणात आपण केला.

डायना स्पिअरमन, का.बा. मराठे, चंद्रकांत बांदिवडेकर,प्र.वा.बापट, ना.वा.गोडबोले,ना.सी.फडके, जे.बी.प्रिस्टले,कुसुमावती देशपांडे, गंगाधर गाडगीळ, भालचंद्र नेमाडे,श्री.मा. कुलकर्णी या समीक्षकांनी कादंबरी विषयी केलेल्या व्याख्या कादंबरीतील जीवनदर्शन, आशय व सामाजिकता याविषयी विचार केला. या समीक्षकांनी केलेल्या विविध व्याख्यांच्या आधारे कादंबरीची स्वरूप वैशिष्टये लक्षात घेतली. त्यावरून कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्यप्रकार आहे हे लक्षात आले.

मराठी कादंबरी वाड्:मयाचे स्वरूप पाहत असताना मराठीत कादंबरी हा वाड्:मयप्रकार मराठीत १८५७ ते १८८५ या काळात उदयास आला.

तसेच ग्रामीण कादंबरीचा उदय कसा झाला याचाही अभ्यास आपण केला. नागनाथ कोत्तापल्ले यांचा विचार ग्रामीण कादंबरीच्या या प्रवाहातच करावा लागतो. ग्रामीण जीवन चित्रित करण्याची जिद्द बाळगून लेखन करण्याचा प्रयत्न करणारे जे लेखक आहेत त्यामध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांचा समावेश होतो.

१९५० ते १९६० नंतर मराठी कादंबरी सर्वार्थाने फुलून आली आहे. तिचा ख-या अर्थाने विकास झाला. या सर्व बाबींचा परामर्श आपण पहिल्या प्रकरणात घेतला.

नागनाथ कोत्तापल्ले हे ग्रामीण साहित्यचळवळीतील एक महत्वाचे नाव आहे. त्यांनी " उलट चालिला प्रवाहो " ही कादंबरी १९८५ साली लिहीली आहे. आणि " गांधारीचे डोळे " ही कादंबरीही १९८५ सालीच लिहीली आहे.

आपण दुस-या प्रकरणामध्ये " उलट चालिला प्रवाहो", या कादंबरीचा अभ्यास केलेला आहे. कादंबरी हा कथन माध्यमातून रूप घेणारा गद्यवाङ्मय प्रकार असल्याने त्याचे सामान्यतः पार्श्वभूमी, कथानक, प्रमुख व्यक्तिरेखा व संवाद, समाजजीवनाचे चित्रण असे प्रमुख घटक कल्पिले आहेत.

या मराठी ग्रामीण कादंबरीने प्रचलित रचनातंत्र झुगारून ग्रामीण वास्तव समर्थपणे साकार केले आहे ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. ग्रामीण अनुभव-विश्वाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे कादंबरीची भाषा होय. ती या उलट चालिला प्रवाहो" मध्ये लेखकाने निवेदन प्रमाण भाषेतून व संवाद अर्थवाही अशा ग्रामीण बोली भाषेत उपयोजले आहेत. साध्या,सरळ, निवेदनातून आणि आवश्यक असेल तेथे संवादातून ही कथा आकार घेत जाते.

आधुनिकता व पारंपारिकता यांच्या संक्रमणावस्थेतून आजचा ग्रामीण समाज जात आहे. नवीन वैचारिक व बौध्दिक जागृती होत असताना अंधःविश्वास, रूढी, जातियता यांचाही प्रभाव समाजावर पडलेला दिसतो. मूल्यनिष्ठा नष्ट झालेली दिसून येते. मुख्य पात्रांच्या भोवती अनेक गौण पात्रे उभी करून त्यांच्याव्दारा समाजरचना,आचार-विचारांचे, रूढीचे,समजूतीचे सामाजिक व्यवस्थेचे चित्र कादंबरीमध्ये निर्माण झालेले दिसते.

" उलट पाळिला प्रवाहो" या कादंबरीमध्ये पार्श्वभूमी पाहिल्यानंतर सर्व कथानकाचा अभ्यास करत असताना असे दिसून आले की घोडेगावामधील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण या कादंबरीत आहे. छोटयाशवा खेडेगावामध्ये राजकारणाचा व भ्रष्टाचाराचा बकासूर शिरून सर्व गाव संघर्षमय झाले आहे. गावातील तंटा मिटवण्यासाठी एका संघटनेचा कार्यकर्ता आलेला आहे. हे गावातील लोकांना आवडत नाही. समाजातील तसा चिटी पत्ते कुटत असलेली दिसून येते. राजकारणाचा व निवडणुकीचा बकासूर पगारेच्या कुटुंबाला हीन अवस्थेला कशा पोहचवतो याचे प्रत्यंतर या कादंबरीमध्ये आपणास दिसून येते.

कथानकाबरोबर काही प्रमुख व्यक्तिरेखांचाही अभ्यास आपण केला. कादंबरीतील पात्रे प्रथम लेखकाच्या कल्पनेत आकाराला येतात. नंतर कथानकाची गुंफणी होते. निवेदन, पात्रे, संवाद यांच्या माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडविले आहे. जे जीवन कादंबरीमध्ये रंगविलेले आहे त्यानुसार गौण पात्रांचे अथवा प्रमुख पात्रांचे व्यक्तिदर्शन घडविलेले आहे.

व्यक्तिरेखाबरोबर समाजजीवनाचाही अभ्यास येथे केला आहे. या कादंबरीतील घटना व पात्रे ही त्या-त्या विशिष्ट समाजाशी निगडित असलेली दिसतात. या कादंबरीमध्ये पात्रांची वर्णने, त्याचे आचार-विचार यातून समाजाचे अस्तित्व जाणवत राहिलेले दिसते. कादंबरीतील माणसे ज्या समाजाचा घटक असतात त्या समाजापासून ती बाजूला काढता येत नाहीत.

ग्रामीण जीवनामध्ये येणा-या अडचणींना सवर्ण व दलित यांना सामोरे कसे जावे लागते याचे चित्रण लेखकाने केलेले दिसून येते. कसे तरी पोट भरून जीवन जगणा-या पगारे सारख्यांच्या कुटुंबाला राजकारण हीन थराला पोहचवते याचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण नागनाथ कोत्तापल्ले यांनी केलेले आहे.

बदलत्या ग्रामीण जीवनाचे अर्थपूर्ण रूप त्यातून आकारास येते. निसर्ग, भाषा, वातावरण, पारंपारिक रूढी, समजुती रीतिरिवाज, श्रद्धा याबरोबरच माणूस शोधण्याचा प्रयत्न नागनाथ कोत्तापल्ले यांनी केला आहे. त्याचबरोबर याबरोबरच कौटुंबिक जीवन व त्यातील गुंतागुंत राजकारण, त्यातील विविध धागे आणि गुंतागुंत शब्दात पकडण्याचा प्रयत्न त्यांनी या कादंबरीमध्ये केलेला दिसून येतो. अशा प्रकारे प्रस्तुत कादंबरीचा कथानक, व्यक्तिरेखा, समाजजीवन आणि दलित सवर्ण संघर्ष या अंगाने अभ्यास केला आहे.

तिसऱ्या प्रकरणात " गांधारीचे डोळे " या कादंबरीचा कथानक, व्यक्तिरेखा, समाजजीवनाचे चित्रण या दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. " गांधारीचे डोळे " या कादंबरीमध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकारणाचे हिडीस रूप व त्यातील सामाजिक जाणिवांचे बेगडीपण उघडकीस आणलेले आहे.

सामाजिक जीवनात अनेक समस्या असतात. जातिभेद, वर्णभेद, शेती, व्यवसाय, परस्पर संबंध यातून ग्रामीण जीवनात तणाव निर्माण होतात. स्वातंत्र्यानंतर राजकारण आले. गटविकास योजना, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, राजकारण, सहकारी सोसायट्या यावर प्रभाव पाडणारा व सत्ता गाजविणारा वर्ग तयार होऊ लागला व त्यातून संघर्ष निर्माण होऊ लागले. असा वर्ग " गांधारीचे डोळे " या कादंबरीत दिसून येतो.

सत्तेसाठी हपापलेले सगळे चोर राजकारणात एकत्र जमतात. राजकारणाबाहेर असणारांची चीड समजून घेणारे व हा संताप बोलून दाखविणारे लोक आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी सर्व तडजोडी करण्यास तयार व उत्सुक असतात हे दिसून येते. " गांधारीचे डोळे " या कादंबरीमध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांनी भ्रष्टाचारी समाजजीवनाचे चित्रण केले आहे.

या कादंबरीमध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांनी नारायणच्या स्वभावावर व वर्तनावर भोवतालच्या परिस्थितीचा, सामाजिक रचनेचा परिणाम कसा झाला आहे हे चित्रित केले आहे.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाच्या वेध घेणाऱ्या आहेत त्यांच्या कादंबरीचा हेतूच एकूण समाज व समाजाच्या व्यवस्थेतील ताण-तणाव यांच्यातील संबंधाचे चित्रण करणे हा आहे. अज्ञान, दारिद्र्य, आणि दुःख यामुळे पिळल्या जात चाललेल्या मानवी मनाचे खरेखुरे चित्रण या कादंबरीत दिसते. सामाजिक, राजकिय, आर्थिक व धार्मिक या क्षेत्रातील दांभिकतेबद्दल असलेला विलक्षण संताप त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेला दिसून येतो. त्यांचा प्रवास मराठी कथावाङ्मय व कादंबरी वाङ्मयाच्या दृष्टीने महत्वाचा ठरलेला आहे.

ग्रामीण भागातील सामाजिक, राजकिय स्थित्यंतरे मानवी जीवनावर परिणाम करतात. संघटनेचे नाव मिळवण्यासाठी व समाज सुधारण्यासाठी सर्व कष्ट पणाला लावून नारायण प्रयत्न करतो. पण त्याच्या कष्टाचे चीज होत नाही म्हणून तो सर्वांना कंटाळून पळ काढतो. राजकारणामुळे ग्रामीण भागातील लोक एकमेकाची वैरी होऊन मरतात तरीही संघर्ष व तणाव वाढतच जातात आणि त्यात नारायणासारखे लोक बळी पडतात.

निवडणुका, मतदान या गोष्टींचा फार मोठा प्रभाव ग्रामीण समाजावर पडला आहे. स्वातंत्र्यप्राप्ती, नवीन राज्यघटना, विविध योजना यामुळेच खेड्यातून राजकारणाला प्रेरणा मिळाली. ग्रामीण भागातील समाजामध्ये संघर्ष, हेवेदावे, ताण-तणाव वाढलेले दिसतात. जीवनाची नवीन क्षेत्रे धुंडाळणाऱ्या नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकीय जीवनावर कादंबरी लिहून सामान्य माणसांची मने जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या कादंबरीतील व्यक्तिरेखांबरोबरच सामाजिक जीवनाचाही अभ्यास आपण केला. अनेक घटकांनी समाजाची बांधणी होत असते. समाज चित्रणांचा विचार करत असताना जातियता, धर्मविचार, श्रध्दा, संकेत, कुटुंबरचना, राजकारण या घटकांचा विचार करावा लागतो. समाजाची स्वतंत्र अशी एक विचारसरणी असते. विशिष्ट परंपरेने एक संस्कृति निर्माण झालेली असते. या संस्कृतीमुळेच त्या गटाचे समाजाहून वेगळेपण सिध्द झालेले दिसते. बहुजन समाजाच्या राहणीमानावरून, वैचारिक पातळीवरून त्या समाजाचे बौध्दिक, नैतिक मुल्यांकन करता येते.

या कादंबरीत सुखासमाधानाने नांदणारे एक गाव राजकारणामुळे संघर्षमय होऊन जाते. निवडणूक कोण लढविणार याची स्पर्धा चालू असतानाच एका स्त्रीवर अत्याचार होतो. पण गावातील लोक कोणी अत्याचार, अन्याय केला आहे हे न पाहता फक्त चर्चा करत असतात. काही लोकांना पैसे मिळत होते म्हणून निवडणूक संपूच नये असे वाटत होते. एकीकडे राजकीय जागृती होत असतानाच दुसरीकडे भ्रष्टाचार, लबाडीवृत्ती व ढोंगीपणा वाढत असलेला दिसून येतो.

या समाजामध्ये जे काही श्रेष्ठ लोक होते तेही असेच होते. भ्रष्टाचाराला मोडून काढण्यासाठी नारायण कल्लोळी हा कार्यकर्ता गावातील परिस्थिती सुधारण्याऱ्या प्रयत्न करतो. तोही शेवटी या समाजाला कंटाळून पळ काढतो. स्वतःच्या आई-वडिलांना न भेटता जावे लागणार म्हणून त्याला वाईट वाटते. हळूहळू आपले फॅमिलीमध्ये परिवर्तन होत आहे असे त्याला वाटू लागते. गावामध्ये राजकारण शिरून सर्व गाव निवडणुकीमुळे कसे संघर्षमय होऊन गेले याचे चित्रण " गांधारीचे डोळे" या कादंबरीत नागनाथ कोत्तापल्ले यांनी केलेले आहे.

नागनाथ कोत्तापल्ले हे एक ग्रामीण कादंबरीकार आहेत. ग्रामीण माणसांची सुख दुःखे, त्यांची स्वप्ने, आशा-आकांक्षा, श्रम, विजय-पराजय यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या विविध साहित्यातून आलेले दिसून येते. कादंबरीच्या क्षेत्रात त्यांनी स्वतःचा ठसा उमटविलेला आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी सामाजिक समस्यांना समर्थपणे वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रभावी व्यक्तिरेखा, मार्मिक संवाद, पात्रानुसार साधी रसाळ भाषा, वाचकांची जिज्ञासा कायम ठेवण्याचे कौशल्य, चटकदार संवाद, घटनांची आकर्षक वर्णने ही नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये दिसून येतात.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीतील भाषाशैली, पात्रे व संवाद यानुसार बदलेली दिसते. सामान्य वाचकांना सहज कळेल अशी साधी, सोपी व रसाळ भाषा त्यांनी आपल्या कादंबऱ्यामध्ये उपयोजिलेली दिसते. त्यांनी वाक्प्रचारांचाही वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांची शैली [illegible] [illegible] आहे.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीतील घटना व पात्रेही त्या-त्या विशिष्ट समाजाशी निगडीत असलेली दिसतात. दोन्ही कादंब-यामध्ये व्यक्तींची वर्णने त्यांचे स्वभावविशेष, त्यांचे संवाद, त्यांचे आचार-विचार यातून समाजाचे अस्तित्व प्रत्यही जाणवत राहिलेले दिसते. त्यामुळे कोत्तापल्ले यांची माणसे ही ज्या समाजाचा घटक असतात त्या समाजापासूनही वेगळी काढता येत नाहीत. जे तीव्रतेने जाणवले, भावले ते त्यांनी लिहीले आहे कधी कुठल्या पंथात घुसण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. कुठला ग्रुपही करण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या या दोन्ही कादंब-या ग्रामीण, सामाजिक व राजकीय आहेत. राजकारण हे नेहमीच सत्ताप्राप्तीचे साधन मानले जाते. स्वातंत्र्यप्राप्ती, नवीन राज्यघटना, विविध योजना यामुळेच खेड्यामधून राजकारणाला प्रेरणा मिळाली. गांधीनी चालवलेल्या स्वातंत्र्य-चळवळी व संघर्ष ग्रामीण जनतेस प्रभावित करण्यास कारणीभूत ठरल्या. राजकारणाच्या संदर्भात ग्रामीण जीवनावर प्रभाव गाजवणारा महत्वाचा पैलू म्हणजे पंचायत राज्याची नवी कल्पना होय. पंचायतीचे कार्यक्षेत्र, जाती, धर्म, समाज एवढ्या पुरतेच मर्यादित होते.

ग्रामपंचायती व पंचायतसमित्या यांचे महत्व राजकारणात वाढले. आणि त्या सत्ता स्थानावर स्वतःचा प्रभाव रहावा म्हणून फार प्रयत्न होऊ लागले. खेड्यातील श्रीमंत जमीनदार प्रथम सत्तेसाठी या निवडणुकीत उतरलेले दिसतात. सत्ता प्राप्त करण्यासाठी सर्व सामान्यांचा पैसा स्वतःला वापरायला मिळतो म्हणून काही हुशार लोक पंचायती चाळण्याचा प्रयत्न करू लागले. "उलट चालिला प्रवाहो", आणि "गांधारीचे डोळे" या कादंबरीतील चित्रण असेच आहे.

राजकारणाचे तत्व अधिक क्रियाशील झाले ते निवडणुकीमुळे· नवीन घटनेने या देशातील सर्वांना मतदानाचा अधिकार दिला· या प्रौढ मताधिकारामुळे गावातील लहान-मोठ्या जाती जागृत झाल्या· नवीन घटनेने या देशातील सर्वांना मतदानाचा अधिकार दिला· स्वतःच्या मानसन्मानाची भावना प्रत्येकाच्या मनात जागृत झालेली दिसते लोक घराघरांतून फिरायला लागले· मतदानाच्या शपथा घेऊ लागले· विडीकाडी, पानसुपारी यावर अमाप खर्च करू लागले· परंतु आपला, परका, मैत्री सहानुभूती या गोष्टींची निवडणुकीच्या रिंगणात विल्हेवाट लागली आहे· निवडणूक, मतदान ह्या गोष्टींचा फार मोठा प्रभाव ग्रामीण समाजावर पडलेला आहे·

राजकारणाचा एक वेगळा पैलू म्हणजे पक्षनिष्ठा होय· ग्रामीण जीवनामध्ये पक्षनिष्ठा खोलवर रूजलेली आपल्याला दिसते· राजकारणामुळे घराघरातील सामुहिकता, व्यावहारिक स्तरावर खंडित झालेली दिसते· पक्षकार्य व पक्षस्वार्थ व्यक्तींना जोडण्याचा प्रयत्न करतात तर हीच पक्षप्रवृत्ती, भेदभाव व वैरही निर्माण करते· पण त्याचबरोबर जातीयता, भाषा, प्रांतीयता इत्यादी पारंपरिक मर्यादांनी विभागलेला शिक्षित समुदाय राजकारणाने एकत्र येतो· ग्रामीण जीवनाच्या संदर्भात पक्षनिष्ठा ही स्वार्थभावनेतून जन्म घेत असलेली दिसून येते· तसेच श्रीमंत जमीनदार आहेत ते सत्तेसाठी एखादया पक्षाशी हातमिळवणी करत असलेले दिसतात· पक्ष बदलणा-या स्वार्थी, संधी-साधूपीहीप्रवृत्ती ही या कादंबरीमध्ये दिसून येते·

राजकारण, ग्रामपंचायती, पंचायतसमित्या, निवडणुका, पक्षनिष्ठा इत्यादी राजकीय पैलूंचा प्रभाव ग्रामीण, प्रादेशिक सामाजिक जीवनावर पडला आहे·

जे राजकारणी जात नष्ट करण्याच्या गोष्टी करतात तेच मते प्राप्त करण्यासाठी माध्यम म्हणून जातीचा वापर करतात. नव्याने मतदाता बनलेल्या ग्रामीण लोकसमुदायांना फक्त पारंपरिक जातीयतेवरच चालणारे राजकारण समजते. शहरीकरण औदयोगिकरणामुळे जातिनिष्ठा कमी होण्यास मदत होत आहे असे वाटले तरी प्रत्यक्षात तात्कालिक जाणवणारा परिणाम मात्र उलटाच दिसतो. अशा प्रकारची जातीयता या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आहे. ग्रामजीवनातील विविध जमातींची पात्रे व त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियामधून कादंबरीच्या कथा-वस्तूला वेगळा संदर्भ प्राप्त झालेला दिसून येतो. नारायण हा जेव्हा गावातील काम आटोपून देवळात जातो तर काही तरुण मुले ही तिथे पत्ते कुटत असलेली दिसतात. ती त्याला म्हणतात की कल्लोळी या नावापेक्षा कांबळे वगैरे नाव असते तर बरे झाले असते. अशा प्रकारे नागनाथ कोत्तापल्ले यांनी जातीबद्दल लोक कसे बोलतात हे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कादंबरीमध्ये जातियतेचे तसेच राजकारणाचे चित्रण फार प्रभावी झालेले आहे.

मानवी जीवन व मूल्ये परिवर्तनशील आहेत मनुष्याचा श्रद्धा, विश्वास, चालीरिती, नीती इत्यादींचा संबंध जीवनप्रणालीशी असतो. बदललेल्या जीवनाबरोबर बदलणाऱ्या मूल्यांचा, शोध या दोन्ही कादंबऱ्यांनी घेतलेला आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज यांच्या संबंधात एक प्रकारचा तणाव निर्माण झाला आहे. शिक्षण, स्वातंत्र्य, नव्या वैज्ञानिक साधनांचा वापर, नवीन कायदे यामुळे एका बाजूला जागृती तर दुसऱ्या बाजूला मानसिक अशांती व नैराश्य येवून ग्रामजीवनात एक अन्तर्विरोध निर्माण झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जे सुख, स्थैर्य खेड्यांना लाभायला हवे होते ते लाभले नाही. सत्ता भोगण्यासाठी श्रीमंत लोकांची धडपड चालू झाली. त्यामुळे नारायणासारख्या विचारी व प्रगत दृष्टिकोन स्वीकारणाऱ्या माणसांना एकटेपण अनुभवावे लागले.

राजकारण, जातीयता, नैतिकता, कुळकायदा यामुळे ग्रामीण जीवनाचे मूळचेएकसंध असे स्वरूप आज दुभंगलेले आहे. स्वातंत्र्यामुळे गावामध्ये आर्थिक जागृती झाली तरी आर्थिक साधने ही पाटलांसारख्या लोकांच्या हाती केंद्रित झालेली दिसून येतात. ग्रामजीवनावर सत्ता गाजविणाऱ्या पदाधिकाऱ्यांनाच विकास योजनांचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे सामान्य शेतकरी गरीब राहिला आणि भ्रष्टाचार, महागाई यामुळे दारिद्र्य जास्तच वाढलेले दिसत आहे.

धर्म हे संस्कृतीचे एक अंग आहे. भारतीय संस्कृतीचे मूळ रूप ग्रामजीवनातच आढळते. साधू, गंडेदोरे, देवदेवर्षी इत्यादींचा धार्मिकतेत समावेश झालेला आहे. चमेलीचे लग्न होते. पण त्याला मूल होत नाही. कारण चमेलीचे पौरुषत्व नष्ट झाले होते. त्याने गंडेदोरे, साधु-संन्याशी, मांत्रिक, नवस-सायास केले. या कशाचाही उपयोग झाला नाही. हे चित्र " गांधारीचे डोळे" या कादंबरीतून दिसून येते. खरं तर आज शिक्षण प्रसाराने धार्मिक व्यवहार निरर्थक वाटू लागले आहेत. राजकारणाचा स्पर्श मंदिर, मठ, तीर्थक्षेत्र आदींनाही झालेला दिसतो

आज विज्ञानामुळे व शिक्षणप्रसारामुळे नास्तिकता वाढू लागलेली दिसते. पण एका बाजूला अज्ञान, आत्मविश्वास, अंध: विश्वास यामुळे माणूस धर्माकडे ओढला जात असतानाच दुसऱ्या बाजूला वैज्ञानिक सुखसोयी-कडे तो आकर्षिला जात असलेला दिसतो. जादूटोणा, भुताखेतावर विश्वास पौराणिक गोष्टीवर श्रध्दा इत्यादी गोष्टीही या कादंबरीमधून आल्या आहेत.

शहराप्रमाणे ग्रामीण जीवनामध्ये स्वातंत्र्यानंतर बरे वाईट बदल घडले. आज ग्रामसमाज रात्रीने बदलत आहे. अशिक्षित आई-वडिल व शिकलेली मुले यांच्यात मानसिक संघर्ष निर्माण झालेला आहे. अस्पृश्यता, निवारण, कुटुंबनियोजन, राजकारण, जिल्हा-परिषदा, पंचायतसमित्या ग्रामपंचायती, निरनिराळ्या सहकारी सोसायटया या नव्या गोष्टींचा ग्रामीण जीवनावर मोठा प्रभाव जाणवू लागला आहे. या आधुनिकतेचा परिणाम या कादंबऱ्यामध्ये चित्रित झालेला दिसतो.

या दोन्ही कादंबरीमध्ये वाक्प्रचारांचा उपयोग केलेला आढळतो. सामान्य व्यवहारात म्हणी व वाक्प्रचार आढळून येतात. बोली भाषेच्या अनुषंगाने म्हणी व वाक्प्रचारांची योजना पात्रांच्या तोंडी आलेली आहे.

या कादंबरीतील समाजाची काही वैशिष्टये आहेत. त्यांच्या चालीरिती, समजुती, आचार-विचार, पोशाख, भाषा इत्यादी सर्वच बाबी कादंबरीमध्ये आल्या आहेत. मुख्य पात्रांच्या भोवती अनेक गौण पात्रे उभी करुन त्यांच्या व्दारा समाजाच्या आचार-विचारांचे, रुढींचे व समजुतीचे चित्रण नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले आहे.

या दोन्ही कादंबरीतील संवाद हे पात्राच्या भाव-भावनांनी रंगलेले आहेत. अत्यंत स्वाभाविक, पात्रानुरुप भावपूर्ण विचार विकारांचे दर्शन घडविणारे व चटकदार संवाद लिहिण्यात नागनाथ कोत्तापल्ले यांचे कौशल्य दिसून येते.

ग्रामीण साहित्याचा उगम प्राधान्याने स्वातंत्र्योत्तर काळातच झाला. नागनाथ कोत्तापल्ले आणि इतर अनेक लेखकांनी ग्रामीण कथा, कादंबरीकार म्हणून लौकिक मिळवला आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून दलितांच्या वेदना आणि त्याचबरोबर इतर समाजाच्या समस्या प्रकट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

समाज-प्रबोधन करून समाजात सुधारणा घडवून आणणे हे नागनाथ कोत्तापल्ले यांच्या लिखाणामागील प्रमुख ध्येय आहे. त्यांच्या कादंबऱ्यांना वास्तवतेचा स्पर्श झालेला दिसून येतो. कुशल व्यक्तिचित्रण हे त्यांच्या कादंबऱ्याचे वैशिष्ट्ये आहे. कथा तंत्राच्या दृष्टीने वाचकाचे कुतूहल व जिज्ञासा कायम ठेवणे, विस्मय व उत्कंठा निर्माण करून कथेचा कादंबरीचा कलात्मक शेवट करण्यात त्यांचे कौशल्य दिसून येते.

विसाव्या शतकातील सामाजिक,आर्थिक व राजकीय स्थित्यंतरे त्यांचा मानवी जीवनावर झालेला बरा-वाईट परिणाम नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबऱ्यातून चित्रित झालेला दिसून येतो. समाजमनाशी हितगूज करण्यासाठी,सामाजिक जाणिवांचा वेध घेण्यासाठी, आणि समाजाच्या मुलभूत प्रेरणा जागृत करण्यासाठी नागनाथ कोत्तापल्ले यांनी कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे व्यासपीठ निवडले आहे. त्यांनी आपल्या दोन्ही कादंब-या राजकीय व सामाजिक जीवनावर लिहून मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये महत्वाची भर घातलेली आहे असे म्हणावे लागते. अशाप्रकारे " उलट चालिला प्रवाहो " आणि " गांधारीचे डोळे " या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या महत्वाच्या कादंबऱ्या आहेत या निष्कर्षावर आपण आलो. कारण या कादंबऱ्यातून लेखकाने ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव-चित्रण घडविले आहे असे दिसून येते.

==========xxxxxxxxx==========

## संदर्भ ग्रंथ सूची


१. कुलकर्णी, मदन — <u>मराठी प्रादेशिक कादंबरी</u>
( तंत्र आणि विकास )
मंगेश प्रकाशन, नागपूर. आवृत्ती पहिली
१९८४.

२. कुलकर्णी श्री. मा. — <u>कादंबरीची रचना,</u>
उन्मेष प्रकाशन, नागपूर
आवृत्ती पहिली १९८६.

३. गाडगीळ, गंगाधर — <u>साहित्याचे मानदंड</u>
पॉप्युलर प्रकाशन मुंबई,
आवृत्ती पहिली १९६२,

४. ठाकूर, र. ना. — <u>मराठी ग्रामीण कादंबरी</u>
मेहता पब्लिशिंग हाऊस
पुणे, आवृत्ती पहिली नोव्हेंबर १९९३.

५. देशपांडे, कुसुमावती — <u>मराठी कादंबरीचे पहिले शतक,</u>
मुंबई मराठी साहित्य संघ,
आवृत्ती दुसरी १९७५.

६. नेमाडे, भालचंद्र — <u>टीकास्वयंवर</u>
साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली, १९९०.

| | |
|---|---|
| ७. फडके, ना. सी. | प्रतिभासाधन, अंजली प्रकाशन, पुणे आवृत्ती आठवी, १९६३. |
| ८. बापट, प्र. वा. आणि गोडबोले, ना. वा. | मराठी कादंबरी, ( तंत्र आणि विकास ) व्हीनस प्रकाशन, पुणे शनिवार पेठ, आवृत्ती तिसरी, सप्टेंबर १९७३. |
| ९. बांदिवडेकर, चंद्रकांत | मराठी कादंबरीचा इतिहास मेहता पब्लिशिंग हाऊस, ११९६ सदाशिव पेठ, पुणे ३०. आवृत्ती पहिली १९८९ |
| १०. भागवत, दुर्गा | केतकरी कादंबरी, मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती पहिली १९६७. |
| ११. मराठे, का. बा. | कादंबरी ग्रंथमाला, प्रकाशन मुंबई, १९७२. |
| १२. स्पिअरमन, डायना | द. नॉव्हेल ॲण्ड सोसायटी रोलेज ॲण्ड केगन पॉल, लंडन १९६६. |

नियतकालिके :

| | |
|---|---|
| प्रतिष्ठान | कादंबरी समीक्षा विशेषांक जानेवारी १९८१. |